RCS 38/2026
Exh. 1

दै.रजि. नं.      /२०२६
दावा दाखल ता.०७/०३/२०२६

रे.क.नं.      /२०२६

मे.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, कागल

यांचे न्यायालयात......

श्री.रघुनाथ विनायक माने,
व.व.६०, धंदा.शेती,
रा.माने मळा, मौजे सांगाव,
ता.कागल, जि.कोल्हापूर
} वादी

विरूद्ध

१) श्रीमती भागिरथी विनायक माने,
व.व.८५, धंदा.काही नाही,
रा.माने मळा, मौजे सांगाव,
ता.कागल, जि.कोल्हापूर
} प्रतिवादी

07/3/2026
Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

Scanned with OKEN Scanner

Order
Issue suit summons to the defendants for the filing of written statement, documents and settlement issues. The defendants shall file the same within 30 days of service of suit summons.
Date : 12/03/2026   C.J.J.D.,Kagal

२) श्री.दिलीप विनायक माने,
व.व.५५, धंदा.शेती,
रा.माने मळा, मौजे सांगाव,
ता.कागल, जि.कोल्हापूर

३-अ) सुशिला रंगराव माने,
व.व.६५, धंदा.घरकाम,
रा.माने मळा, मौजे सांगाव,
ता.कागल, जि.कोल्हापूर

३-ब) सुप्रिया धनाजी आडोळे,
व.व.३५, धंदा.नोकरी व घरकाम,
रा.जयसिंगराव पार्क, कागल,
ता.कागल, जि.कोल्हापूर

३-क) सौ.माधुरी चेतन माळी,
(माधूरी रंगराव माने-लग्नापुर्वीचे नांव)
व.व.३२, धंदा.नोकरी व घरकाम,
रा.माळी गल्ली, कसबा सांगाव,
ता.कागल, जि.कोल्हापूर

४) सुमन वसंत पाटील,
व.व.५८, धंदा.घरकाम,
रा.गुरव गल्ली, म्हाकवे,
ता.कागल, जि.कोल्हापूर

} प्रतिवादी

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

Scanned with OKEN Scanner

दावा- अविभक्त कुटूंबाच्या मिळकतीसंबंधी सरस-
निरस मानाने वाटपाचा, व कायम मनाईसाठी
दावेची सर्व कारणांकरीता आकारणी रक्कम
रू.१,४००/- (अक्षरी रूपये एक हजार चारशे
फक्त) व कोर्टाचे अधिकारासाठी रक्कम
रू.१,४००/- (अक्षरी रूपये एक हजार चारशे
फक्त)
स्पेसीफीक रिलीफ ॲक्ट कलम ३४ प्रमाणे व
सी.पी.सी. कलम ९ प्रमाणे

यातील वादी मे.कोर्टास नम्रपणे कळवितात ते खालीलप्रमाणे :-

१. दावा मिळकतीचे वर्णन :

ए) जिल्हा कोल्हापूर, तालुका कागल पैकी मौजे सांगाव या गावचे हद्दीतील शेतजमीन मिळकती खालीलप्रमाणे :

| अ. नं. | भूमापन गट नंबर | क्षेत्र हे.आर. | आकार रू.पै. | यापैकी क्षेत्र हे.आर. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | १८५/२ | 0-४६ | २-२७ | 0-0३.८४ | 0-१९ |
| २ | १९१ | 0-६१.३0 | ४-१२ | 0-२३.६२ | १-५९ |
| ३ | २१६ | 0-१३ | 0-९९ | 0-0३.२५ | 0-२५ |
| ४ | २२४ | १-३७ | १३-७0 | 0-३४.२५ | ३-४२ |
| ५ | २४६ | 0-५५ | ६-३७ | 0-१३.७४ | १-५९ |

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal


Scanned with OKEN Scanner

बी) जिल्हा कोल्हापूर, तालुका कागल पैकी कसबा सांगाव या गावचे हद्दीतील शेतजमीन मिळकती खालीलप्रमाणे :

| अ. नं. | भूमापन गट नंबर | क्षेत्र हे.आर. | आकार रू.पै. | यापैकी क्षेत्र हे.आर. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | १४५४ | 0-१६ | १-८८ | 0-१६ | १-८८ |
| २ | १४६५ | 0-0६ | 0-६८ | 0-0६ | 0-६८ |

...... येणेप्रमाणे वर्णनाच्या 'ए' व 'बी' शेतजमीन मिळकती या सदर दावेचा विषय असून येथून पुढे सदर मिळकतीस 'दावा मिळकत' असे संबोधण्यात येत आहे.

२. <u>यातील वादी व प्रतिवादी यांची नाती दर्शवणारी वंशावळ खालीलप्रमाणे:</u>




...... येणेप्रमाणे वंशावळ होय.

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

Scanned with OKEN Scanner

वादी, प्रतिवादी यांचे मुळ पुरूष कै.विनायक गणू माने हे होत. सदर विनायक माने हे मयत असून त्यांना भागिरथी, रघुनाथ, दिलीप, कै.रंगराव व सुमन असे पत्नी, मुले व मुलगी सरळ वारस आहेत. त्यापैकी रंगराव हा मयत असून त्यास सुशिला ही पत्नी, सुप्रिया व माधूरी या मुली असे वारस आहेत.

३. वर कलम १ मध्ये वर्णन केलेल्या दावा मिळकती वादी व प्रतिवादी यांच्या वडिलोपार्जित मालकी व वहिवाटीच्या मिळकती आहेत. वर कलम १ मध्ये वर्णन केलेल्या दावा मिळकतीमध्ये वादी यांचा १/५ अविभक्त हिस्सा आहे व प्रत्येक प्रतिवादी यांचा प्रत्येकी १/५ अविभक्त हिस्सा आहे.

४. वर कलम १ मध्ये वर्णन केलेल्या दावा मिळकतीमध्ये वादी यांची १/५ इतक्या हिस्सेने पहिल्यापासून प्रत्यक्ष मालकी व वहिवाट चालू आहे. दावा शेतजमीनीमध्ये वादी हे समाईकात सालदरसाल स्वत: कष्ट मशागत करून ऊस, सोयाबीन, भुईमूग इ.पिके घेत असतात.

५. दावा मिळकती या यातील वादी व प्रतिवादी यांच्या वडिलार्जित व हिंदू एकत्र कुटूंबाच्या मिळकती आहेत. यातील वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान दावा मिळकतीबाबत केंव्हाही सरसनिरस मानाने अगर बाय मेड्स ॲण्ड बॉन्डस ने वाटप झालेले नव्हते व नाही.

६. यातील वादी व प्रतिवादी यांचे एकत्र कुटूंब हिंदू समाजाचे असून त्यास हिंदू कायदा लागू होतो. दावा मिळकतीपैकी समाईक मिळकतीमध्ये वादी यांचा हिंदू वारसा कायदयाने १/५ हिस्सा आहे. सदरचा हिस्सा

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

Scanned with OKEN Scanner

तुटक होवून यातील वादींना कायदयाने मिळणे न्यायाच्या दृष्टीने गरजेचे आहे.

७. वरीलप्रमाणे परिस्थिती असताना यातील वादी यांनी प्रतिवादी यांचेकडे दि.०१.०३.२०२६ इ.रोजीचे (एक मार्च सन दोन हजार सव्वीस) दावा मिळकतीमध्ये असणारा कायदेशिर हिस्सा सरसनिरस मानाने तुटक करून मागितला आता प्रतिवादी यांनी वाटप करून देणेचे स्पष्टपणे नाकारले आणि "आम्ही तुम्हांला दावा मिळकतीचे वाटप करून देणार नाही. तुम्हांला काय करायचे ते कर", असे प्रतिवादी यांनी धमकावले आहे. तसेच प्रतिवादी हे वादींना त्याचदिवशी दावा मिळकतीमध्ये सोई प्रमाणे समाईकात वहिवाट करणेस प्रतिबंध करणेचा प्रयत्न केला, त्यामुळे वादी यांना प्रतिवादी यांचेविरूद्ध वाटपाकरीता व कायम मनाई ताकीद होवून मिळणेकरीता सदरचा दावा दाखल करणे भाग पडत आहे.

८. <u>दावेस कारण :</u>

यातील वादी यांनी प्रतिवादी यांचेकडे दि.०१.०३.२०२६ इ.रोजीचे (एक मार्च सन दोन हजार सव्वीस) दावा मिळकतीमध्ये असणारा कायदेशिर हिस्सा सरसनिरस मानाने तुटक करून मागितला आता प्रतिवादी यांनी वाटप करून देणेचे स्पष्टपणे नाकारले आणि "आम्ही तुम्हांला दावा मिळकतीचे वाटप करून देणार नाही. तुम्हांला काय करायचे ते कर", असे प्रतिवादी यांनी धमकावले आहे. तसेच प्रतिवादी हे वादींना त्याचदिवशी दावा मिळकतीमध्ये सोईप्रमाणे समाई

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

Scanned with OKEN Scanner

कात वहिवाट करणेस प्रतिबंध करणेचा प्रयत्न केला त्यावेळी सदरचे दावेस कारण घडले आहे.

९. <u>दावेचा तपशील</u> :

| रू. पै. | |
|---|---|
| ४००-०० | दावा मिळकतीचा एकूण आकार रू.९-६० पैसे आहे, त्यातील वादी यांचे हिस्सेचे १/५ हिश्याचा पुर्णांकात आकार रू.२-०० पैसे होते त्याचे २०० पट आकारणी पुर्णांकात सदरी दाखल. |
| १,०००-०० | दावा कायम मनाईकरीता असलेने सदरी दाखल |
| १,४००-०० | एकूण आकारणी (अक्षरी रूपये एक हजार चारशे फक्त) |

येणेप्रमाणे दावेची आकारणी केली असून प्रस्तुत दाव्यास योग्य त्या रक्कमेचा स्टॅम्प बॉम्बे कोर्ट फीज ॲक्ट कलम ६ (v) (vii) मधील तरतुदीप्रमाणे लावलेला आहे.

१०. वादी, प्रतिवादी व दावा मिळकती या कोर्टाचे हद्दीत आहेत व दावेस कारण या कोर्टाचे हद्दीत घडले आहे. सबब, सदरचा दावा मे.कोर्टात चालणेस पात्र आहे.

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal
07/03/2026

Scanned with OKEN Scanner

११. प्रस्तुत दावा मिळकतीबाबत अन्य कोणत्याही कोर्टात वादी, प्रतिवादी दरम्यान वाद प्रलंबीत नाही.

१२. प्रस्तुत दावा वाटपाकरीता व कायम मनाईकरीता असलेने प्रस्तुत दावा मुदतीत दाखल आहे.

१३. <u>सबब वादींची विनंती की,</u>

अ) वादीचा दावा खर्चासह मंजूर करणेत यावा.

ब) दावा अर्जी कलम १ मधील दावा शेतजमीन मिळकतीचे वादी यांचा १/५ हिस्सा सरस निरस मानाने वाटप करून स्वतंत्रपणे तुटक करून अगर वादीस कायद्याप्रमाणे प्राप्त होणारे हिस्सेचे सरस निरस मानाने वाटप करून स्वतंत्रपणे वादीचा हिस्सा वादीचे कब्जात मिळावा.

क) दावा मिळकत शेतजमीनीचे वाटप मे.जिल्हाधिकारीसो कोल्हापूर यांचेमार्फत करून मिळावे.

ड) दावा मिळकतीमधील वादी यांच्या प्रतिवादी यांचेसोबत समाईकात सोईप्रमाणे सुरू असलेल्या शांततामय कब्जावहिवाटीस प्रतिवादी यांनी अगर त्यांचेतर्फे वालीवारस, नोकर चाकर, इ.इसमांनी हरकत, अडथळा करू नये व वादीस दावा मिळकतीतून हुसकावून (Oust) लावू नये याकरीता त्यांचेविरूद्ध कायम मनाई हुकूम करणेत यावा.

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

Scanned with OKEN Scanner

इ) वर कलम 'ड' मध्ये नमूद केलेप्रमाणे प्रस्तुत दावेचे अंतिम निकालापावेतो प्रतिवादी यांस तुर्तातुर्त मनाई ताकीद व्हावी.

ई) या दाव्याचा संपूर्ण कोर्ट खर्च प्रतिवादीकडून वसूल होऊन मिळावा.

प) कारणपरत्वे दावा दुरूस्तीस मे.कोर्टाची परवानगी असावी.

फ) इतर न्यायाचे अनुषंगीक हुकूम याच कामी वादीचे बाजूने व्हावेत.

...... येणेप्रमाणे दावा असे.

सोबत वकीलपत्र, कागदाची यादी, यादीप्रमाणे कागद, पत्ता मेमो, प्रतिवादी यांना देणेसाठी दावा नक्कला असे.

कागल मे.जा.व्हावे.

दि.०७/०३/२०२६ वादी

दावा तयार करणार व दाखल करणार

रघुनाथ विनायक माने

श्री.रघुनाथ विनायक माने

ॲड.बी.बी.मगदूम

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

Scanned with OKEN Scanner

## प्रतिज्ञा

मी यातील वादी श्री. रघुनाथ विनायक माने, व.व.६०, धंदा.शेती, रा.माने मळा, मौजे सांगाव, ता.कागल, जि.कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील दावेतील संपुर्ण मजकूर माझे प्रत्यक्ष माहिती व समजुतीनुसार खरा व बरोबर आहे, म्हणून केली प्रतिज्ञा आज मु.कागल, दि.०७/०३/२०२६.

रघुनाथ विनायक माने

## ॲफिडेव्हीट

मी यातील वादी श्री. रघुनाथ विनायक माने, व.व.६०, धंदा.शेती, रा.माने मळा, मौजे सांगाव, ता.कागल, जि.कोल्हापूर देवाची शपथ घेवून सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील दावेतील संपुर्ण मजकूर माझे प्रत्यक्ष माहिती व समजुतीनुसार खरा व बरोबर आहे, म्हणून शपथेवर केले ॲफिडेव्हीट आज मु.कागल.दि.०७/०३/२०२६

प्रतिज्ञापत्र करणार यांस मी ओळखतो

ॲड.बी.बी.मगदूम

रघुनाथ विनायक माने

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal
07/03/2026

Scanned with OKEN Scanner

## प्रतिज्ञा

मी यातील वादी श्री.रघुनाथ विनायक माने, व.व.६०, धंदा.शेती, रा.माने मळा, मौजे सांगाव, ता.कागल, जि.कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील ॲफिडेव्हीटमधील संपुर्ण मजकूर माझे प्रत्यक्ष माहिती व समजुतीनुसार खरा व बरोबर आहे, म्हणून केली प्रतिज्ञा आज मु.कागल, दि.०७/०३/२०२६.

रघुनाथ विनायक माने

Solemnly Affirmed before me by
Shri रघुनाथ विनायक माने
who is identified by Shri
whom I know personally
Dated 07/03/2026
Assistant Superintendent

Scanned with OKEN Scanner

MADKE AJIT BHISHMA
Digitally signed by MADKE AJIT BHISHMA
Date: 2026.03.12 17:18:25 +0530